जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २३१ | मंगळवार, १७ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210




## ‘मिशन बारामती’ला सुरुंग?; भाजपचे नेते पहिल्याच परीक्षेत फेल

**पुणे, ता. १६ :** महाराष्ट्राच्या राजकारणात बारामती हा केवळ एक मतदारसंघ नसून तो एक ‘प्रतिष्ठेचा गड’ मानला जातो. हा गड सर करण्यासाठी भारतीय जनता पक्षाने गेल्या काही वर्षांपासून आपली सर्व शक्ती पणाला लावली आहे. त्यासाठी ‘ऑपरेशन लोटस’च्या माध्यमातून इतर पक्षांतील बड्या नेत्यांना गळाला लावण्याचे धोरण भाजपने आखले. मात्र, नुकत्याच पार पडलेल्या पंचायत समिती सभापती आणि उपसभापती पदाच्या निवडणुकांनी भाजपला जमिनीवर आणले आहे. ज्या ‘तीन बड्या नेत्यांच्या’ बळावर भाजप २०२९ चे स्वप्न पाहत आहे, ते मोहरे चक्क आपल्याच घरच्या मैदानात अपयशी ठरल्याचे चित्र समोर आले आहे.

पुणे जिल्हा हा दशकांपासून राष्ट्रवादी काँग्रेसचा अभेद्य गड राहिला आहे. हा बालेकिल्ला भेदण्यासाठी भाजपने गेल्या वर्षभरात अनेक पावले उचलली. काँग्रेसचे पुरंदरचे माजी आमदार संजय जगताप, भोर-राजगड-मुळशीचे नेते संग्राम थोपटे आणि इंदापूरचे प्रवीण माने यांना आपल्या गोटात सामील करून घेतले. भाजपला आशा होती की, या नेत्यांच्या स्थानिक ताकदीमुळे ग्रामीण पुणे जिल्ह्यात कमळ वेगाने फुलेल आणि बारामती लोकसभेचा रस्ता सोपा होईल.

नुकत्याच झालेल्या निकालांनी भाजपच्या या रणनीतीतील त्रुटी उघड केल्या आहेत. जिल्ह्यातील १३ पंचायत समित्यांपैकी तब्बल १० समित्यांवर राष्ट्रवादी काँग्रेसने आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. भाजपला केवळ ‘दौंड’ची एकमेव पंचायत समिती राखता आली.

काँग्रेसमध्ये असताना ज्या भोर, वेल्हा आणि मुळशीवर थोपटेंचे एकछत्री राज्य होते, तिथे भाजपची ‘कमळ’ निशाणी त्यांना विजय मिळवून देऊ शकली नाही. जरी त्यांनी पहिल्यांदाच या भागात भाजपचे खाते उघडले असले तरी, राष्ट्रवादीच्या लाटेसमोर त्यांचे वर्चस्व टिकले नाही. संजय जगताप यांना पुरंदरची सत्ता राखता आली नाही, तर प्रवीण माने यांना इंदापूरमध्ये राष्ट्रवादीच्या बालेकिल्ल्याला खिंडार पाडता आले नाही. राजकीय विश्लेषकांच्या मते, केवळ मोठे नेते पक्षात घेतल्याने जनमत बदलत नाही. भाजपसाठी हा निकाल धोक्याची घंटा आहे. पक्षाने जरी या नेत्यांच्या माध्यमातून जिल्ह्यात ‘अस्तित्व’ निर्माण केले असले, तरी ते सत्तेपर्यंत पोहोचण्यासाठी पुरेसे नाही. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांतील कार्यकर्त्यांची स्थानिक पकड आजही भाजपच्या तुलनेत अधिक मजबूत असल्याचे या निकालांनी अधोरेखित केले आहे. पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या निवडणुका ग्रामीण राजकारणाची ‘लिटमस टेस्ट’ मानल्या जातात. २०२९ च्या निवडणुकीआधीची ही पहिलीच मोठी परीक्षा होती.

# पुणे शहरासह जिल्ह्यात मेडिक्लेमच्या नावाखाली रुग्णांची सर्रास लूट

## सेकंड किंवा थर्ड ओपिनियन घ्या अन्यथा नरड्यावर आर्थिक लुटीचा सत्तूर

**लोणी काळभोर, ता. १६ :** पुणे शहरासह जिल्ह्यातील अनेक खाजगी व धर्मादाय रुग्णालयांमध्ये मेडिक्लेमच्या नावाखाली रुग्णांची सर्रास आर्थिक लूट सुरू असल्याचे धक्कादायक चित्र समोर येत आहे. रुग्णांकडे मेडिक्लेम असल्याचे कळताच काही रुग्णालयांकडून उपचारांचे अवास्तव बिल तयार करून लाखो रुपयांची वसुली केली जात असल्याच्या तक्रारी दिवसेंदिवस वाढू लागल्या आहेत. त्यामुळे आरोग्यसेवा ही समाजसेवा नसून काही ठिकाणी ती सरळ धंदा बनल्याची संतप्त भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

पुणे शहर, जिल्हा तसेच पूर्व हवेलीतील अनेक बड्या रुग्णालयात घडलेला प्रकार याचे ठळक उदाहरण ठरत आहे. संबंधित रुग्णालयात विमा नसलेल्या रुग्णासाठी ६० ते ७० हजार रुपयांत होणारी शस्त्रक्रिया, रुग्णाकडे मेडिक्लेम असल्याचे कळताच थेट १ लाख ६० ते ७० हजार रुपयांपर्यंत बिल लावून केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. त्यामुळे मेडिक्लेम हा रुग्णांसाठी संरक्षण नसून काही रुग्णालयांसाठी कमाईचे साधन बनल्याची चर्चा सुरू झाली आहे. याहून गंभीर बाब म्हणजे, विमा कंपनीकडून संपूर्ण बिल मंजूर झाले नसल्याचे कारण देत रुग्णांकडून अतिरिक्त रक्कम वसूल केली जात असल्याच्या तक्रारीदेखील पुढे येत आहेत. परिणामी, विमा घेतलेल्या रुग्णांनाच सर्वाधिक आर्थिक फटका बसत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

पुणे शहर आणि जिल्ह्यातील अनेक नामांकित रुग्णालयांमध्ये अशा प्रकारची पद्धत सर्रास सुरू असल्याची चर्चा असून, अनेक रुग्णांना उपचारासाठी दाखल होताच थेट ॲडमिट केले जात असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे रुग्णांना सेकँड किंवा थर्ड ओपिनियन घेण्याची संधीही मिळत नाही आणि त्यानंतर मोठ्या बिलांचा धक्का बसतो.




दरम्यान, नागरिक दरवर्षी मोठी रक्कम भरून आरोग्य विमा घेत असतानाही त्यांची अशा प्रकारे फसवणूक होत असेल, तर ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. त्यामुळे प्रशासन, विमा कंपन्या आणि आरोग्य विभागाने या प्रकाराची तातडीने दखल घेऊन संबंधित रुग्णालयांची सखोल चौकशी करावी व दोषी आढळल्यास कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

आरोग्यसेवा ही समाजसेवा मानली जाते; मात्र काही रुग्णालयांच्या अशा मनमानी कारभारामुळे रुग्णालये गरिबांचे वाली नाहीत आणि मेडिक्लेमधारकांचे सुद्धा नाहीत अशी संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे. काही ठिकाणी रुग्णांकडे सेवा घेणाऱ्या व्यक्तीऐवजी गिऱ्हाईक म्हणून पाहिले जात असल्याचा आरोपही नागरिकांकडून केला जात आहे.


तज्ज्ञांच्या मते, रुग्णांनी उपचारासाठी दाखल होण्यापूर्वी शक्य असल्यास सेकंड किंवा थर्ड ओपिनियन घेणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा अशा प्रकारच्या बिलांच्या जाळ्यात अडकून आर्थिक लुटीला सामोरे जावे लागू शकते. या प्रकाराला वेळेत आळा बसला नाही, तर लाखो रुपये भरून आरोग्य विमा घेणाऱ्या सामान्य नागरिकांची लूट अशीच सुरू राहणार, हे मात्र काळ्या दगडावरची काळी रेघ असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

याबाबत नाव न छापण्याच्या अटीवर एका रुग्णाने धक्कादायक अनुभव सांगितला. पूर्व हवेलीतील एका बड्या रुग्णालयात मूळव्याधीच्या शस्त्रक्रियेची चौकशी करण्यासाठी गेलो असता तेथील डॉक्टरांनी ८० हजारांहून अधिक खर्च येईल, असे सांगितले. मात्र संशय आल्याने मी दुसऱ्या रुग्णालयात सेकंड ओपिनियन घेतले. तेव्हा तेथील डॉक्टरांनी हीच शस्त्रक्रिया केवळ ४० हजार रुपयांत होऊ शकते, असे सांगितले. यानंतर त्या रुग्णालयात माझ्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली आणि मी पूर्णपणे ठणठणीत बरा झालो आहे, असे संबंधित रुग्णाने सांगितले.

जर मी सेकंड ओपिनियन घेतले नसते, तर ८० हजारांहून अधिक रक्कम मोजावी लागली असती. त्यामुळे नागरिकांनी अशा रुग्णालयांपासून सावध राहणे अत्यंत गरजेचे आहे. शक्य असल्यास सेकंड ओपिनियन नक्की घ्या, असे आवाहनही त्यांनी केले. रुग्णांच्या असहायतेचा गैरफायदा घेऊन अवास्तव बिल लावणाऱ्या अशा रुग्णालयांचा मी तीव्र शब्दांत धिक्कार करतो, अशी संतप्त प्रतिक्रियाही त्यांनी व्यक्त केली.

## यशाचे ‘शिखर’ सर करणाऱ्या गुणवंतांचा पुण्यात गौरव; युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरमचा दिमाखदार सोहळा संपन्न

**पुणे, ता. १६ :** युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरमच्या वतीने कै. डॉ. बी. एन. देशपांडे व डॉ. विनोद डोंबे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित करण्यात आलेला गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा उत्साहात पार पडला. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या बीएएमएस २०२५ परीक्षेत यश संपादन केलेल्या तसेच संस्थेच्या मोफत युपीएससी व एमपीएससी मार्गदर्शन आणि शिष्यवृत्ती उपक्रमातून यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांचा या वेळी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन हडपसर येथील टेरेट्री रेस्टॉरंट करण्यात आले होते.



यावेळी बीएएमएस अंतिम परीक्षेत विद्यापीठात प्रथम तीन क्रमांक पटकावणाऱ्या डॉ. तनया काळे, डॉ. ऋतुजा भाकरे आणि डॉ. ऋषिकेश पराड यांचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच विविध विषयांमध्ये प्रथम क्रमांक मिळवलेल्या डॉ. ऋतुजा भाकरे (कायचिकित्सा) व डॉ. गजानन कुलकर्णी (शल्यतंत्र) यांचाही सन्मान करण्यात आला.

संस्थेच्या मार्गदर्शनाखाली युपीएससी परीक्षा २०२४-२५ मध्ये यश मिळवलेल्या मनोज पाटील, धनंजय दिघे, अल्पेक्ष ढवळे आणि हेमकृष्ण पिसदे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच एमपीएससी परीक्षेत यश मिळवलेल्या मंगेश सुरुशे व चेतन वंजारी यांचाही गौरव करण्यात आला. CPF परीक्षेत यश संपादन केलेल्या अनुप द्विवेदी, भुवनेश कांबळे आणि निखिल वसईकर यांनाही या वेळी सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाला पोलीस उपमहानिरीक्षक प्रकाश रेड्डी, सीबीआय उपमहानिरीक्षक सारा शर्मा, पुणे पासपोर्ट कार्यालयाचे प्रमुख डॉ. विनोद गायकवाड, डॉ. महेश दळे, राज्याचे उपमहासंचालक (नारकोटिक्स) डॉ. केतन पाटील, पोलीस अधीक्षक जयश्री देसाई व सोहम मांढरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना जिद्द, सातत्य आणि कौशल्य विकासाचे महत्त्व अधोरेखित करत प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

दरम्यान, संस्थेचे अध्यक्ष डॉ. विक्रम गायकवाड यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा देताना आतापर्यंत युपीएससी, CPF आणि एमपीएससी परीक्षांमध्ये एकूण ५३ विद्यार्थ्यांची निवड झाल्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. समीर ननावरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सोनल भालेराव यांनी केले, तर आभार डॉ. कल्पेश वाणी यांनी मानले.

## भिगवण स्टेशन येथे मैला गाळ प्रकल्पाला ग्रामस्थांचा कडाडून विरोध

### स्थलांतर न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**सागर जगदाळे**

भिगवण, ता. १६ : भिगवण स्टेशन येथील स्मशानभूमी लगत सुरू असलेल्या मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्पाला ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविला असून हा प्रकल्प तात्काळ इतरत्र स्थलांतरित करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे केली आहे.

ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, भिगवण स्टेशन परिसरातील स्मशानभूमीजवळ या प्रकल्पाचे काम सुरू करण्यात आले आहे. मात्र त्या ठिकाणी नाथपंथी डवरी गोसावी समाजाची दफनभूमी असून या प्रकल्पामुळे त्या ठिकाणी जागेची कमतरता निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या ठिकाणी प्रकल्प उभारल्यास स्थानिकांच्या भावना दुखावल्या जाण्याची शक्यता असल्याचे ग्रामस्थांनी म्हटले आहे. तसेच या प्रकल्पांतर्गत ४० हून अधिक गावांमधील मैला व घाण या ठिकाणी आणून त्यावर प्रक्रिया केली जाणार असल्याची माहिती मिळत असून त्यामुळे उग्र वास व दुर्गंधीचा त्रास भिगवण व परिसरातील नागरिकांना सहन करावा लागण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.



दरम्यान, ज्या ठिकाणी हा प्रकल्प उभारण्यात येत आहे त्या परिसरात गावाचा जलशुद्धीकरण प्रकल्पही सुरू असून या प्रकल्पामुळे त्या कामावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी भिगवण व भिगवण स्टेशन येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विशेष ग्रामसभेची मागणी**

हा प्रकल्प सुरू करताना ग्रामस्थांना कोणतीही माहिती देण्यात आली नसल्याचा आरोप करत भिगवण स्टेशन येथे स्वतंत्र विशेष ग्रामसभा आयोजित करून प्रकल्पाची सविस्तर माहिती द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच ग्रामसभेत सर्वानुमते ठराव झाल्यानंतरच पुढील काम सुरू करावे, असेही ग्रामस्थांनी स्पष्ट केले आहे. सदरचा मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्प इतरत्र स्थलांतरित न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

बांधकाम थांबवण्याच्या सूचना भिगवण ग्रामपंचायतचे सरपंच प्रशासक गुरप्पा पवार यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, मासिक सभा किंवा ग्रामसभेत या प्रकल्पाबाबत ठराव झाला आहे की नाही हे तपासावे लागेल. मात्र ग्रामस्थांनी केलेल्या मागणीनुसार लवकरच ग्रामसभा घेऊन प्रकल्पाची माहिती दिली जाईल, तसेच सध्या प्रकल्पाचे बांधकाम थांबवण्याच्या सूचना ठेकेदाराला देण्यात आल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.

## सोनसाखळी चोरणारा अल्पवयीन चोरटा जेरबंद; पावणे दोन लाखांचा मुद्देमाल जप्त

**उरुळी कांचन, ता. १६ :** पहाटे पतीसह चालण्यासाठी गेलेल्या महिलेच्या गळ्यातील अडीच तोळ्यांची सोनसाखळी हिसकावून पळण्याचा प्रयत्न करणाऱ्या अल्पवयीन चोरट्याला नागरिकांनी शिताफीने पकडले आहे. त्यानंतर नागरिकांनी चोरट्याला तात्काळ पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

उरुळी कांचन (ता. हवेली) परिसरात सोमवारी (ता. १६ ) पहाटे सुमारे पावणे सहा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. संबंधित महिलेच्या पतीच्या प्रसंगावधानामुळे चोरीचा डाव फसला असून पोलिसांनी आरोपीकडून दुचाकीसह सुमारे १ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी जयश्री भरत काळे (वय ४३ , रा. काळेवाडा, उरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे) यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून पोलिसांनी एका अल्पवयीन चोरट्याला ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जयश्री काळे या आपल्या पती भरत लक्ष्मण काळे (वय ५१ ) यांच्यासह सोमवारी पहाटे नेहमीप्रमाणे उरुळी कांचन येथील महात्मा गांधी विद्यालयाच्या मैदानावर चालण्यासाठी गेल्या होत्या. सकाळी सुमारे साडेसहा वाजण्याच्या सुमारास त्या शाळेच्या कोपऱ्याजवळ आल्या असताना काळा-लाल रंगाच्या बजाज पल्सर दुचाकीवरून आलेल्या एका युवकाने त्यांच्या गळ्यातील अडीच तोळे वजनाचे सोन्याचे मिनींगठण जबरदस्तीने हिसकावण्याचा प्रयत्न केला.

यावेळी प्रसंगावधान राखत भरत काळे यांनी त्या दुचाकीला पाठीमागून पकडले. त्यामुळे दुचाकी खाली पडली व आरोपी तेथून पळून जाण्याचा प्रयत्न करू लागला. दरम्यान, जयश्री व भरत काळे यांनी मोठ्याने चोर चोर असा आरडाओरडा केला. त्यामुळे परिसरातील नागरिक धावत आले. विजय कांचन व इतर नागरिकांच्या मदतीने त्या युवकाला पकडून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

पोलिसांच्या चौकशीत आरोपी हा अल्पवयीन असून तो सांगसे (ता. मावळ, जि. पुणे) येथील रहिवासी असल्याचे समोर आले. पोलिसांनी त्याच्याकडून २ लाख रुपये किंमतीचे अडीच तोळे सोन्याचे मिनींगठण तसेच ७० हजार रुपये किंमतीची एमएच १२ एम.बीए ८००७ क्रमांकाची बजाज पल्सर दुचाकी असा एकूण २ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दरम्यान, या घटनेमुळे उरुळी कांचन परिसरात सकाळच्या वॉकदरम्यान महिलांच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा चिंता व्यक्त होत असून, नागरिकांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे चोरट्याचा डाव फसल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

## हवेलीतील जिल्हा परिषद शाळांसाठी सभापती–उपसभापती चषक स्पर्धा

### सभापती युवराज काकडे यांची मोठी घोषणा

**लोणी काळभोर, ता. १६ :** हवेली तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि शिक्षकांना प्रोत्साहन देण्यासाठी पंचायत समिती सभापती, उपसभापती चषक व शिक्षक संघ चषक स्पर्धेची घोषणा करण्यात आली आहे. हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज हिरामण काकडे यांनी ही घोषणा करत शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी शिक्षकांच्या पाठीशी कायम उभे राहण्याचे आश्वासन दिले.

हवेली तालुका प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने हवेली पंचायत समितीचे नवनिर्वाचित सभापती युवराज काकडे, उपसभापती विद्या गायकवाड यांचा सत्कार समारंभ थेऊर येथे पार पडला. हवेली तालुका शिक्षक संघाच्या वतीने सभापती, उपसभापती यांना विशेष सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी युवराज काकडे बोलत होते.



यावेळी हवेली तालुका प्राथमिक शिक्षक संघाचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य,महिला आघाडी तसेच तालुक्यातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी हवेली तालुका प्राथमिक शिक्षक संघाच्या नुतन कार्यकारिणी सदस्यांची घोषणा यावेळी शिक्षक संघाच्यावतीने करण्यात आली. यावेळी सभापती व उपसभापती यांच्याहस्तेनव्या कार्यकारिणीसदस्यांना निवडपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी शिक्षकांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी आणि शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी कायम शिक्षकांच्या पाठीशी राहण्याचे आश्वासन सभापती युवराज काकडे व उपसभापती विद्या गायकवाड यांनी दिले. हवेली तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांसाठी, जिल्हा परिषदेच्या जिल्हा परिषद अध्यक्ष चषकाच्या धर्तीवर, तालुका स्थरावरील शाळांना व शिक्षकांना प्रोत्साहन मिळण्यासाठी पंचायत समिती सभापती, उपसभापती चषक व शिक्षकसंघ चषक या चषकांची नव्याने घोषणा यावेळी करण्यात आली. तालुका स्तरावरील प्रथम क्रमांकाच्या शाळेसाठी सभापती चषक व २५ हजार रुपये पारितोषिक, द्वितीय क्रमांकासाठी उपसभापती चषक व १५ हजार रुपये पारितोषिक, तृतीय क्रमांकासाठी शिक्षक संघ चषक व १० हजार रुपये पारितोषिक असे बक्षीस देण्यात येणार आहे.

दरम्यान, या पुरस्कारांचे वितरण आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके, जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष या मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात येणार असल्याचे सभापती काकडे यांनी सांगितले. तसेच तालुक्यातील सर्व शाळांनी यात सहभागी होण्यासाठी, शाळेच्या सर्व शिक्षक बांधवांनी शाळांचा दर्जा व गुणवत्तापूर्ण शिक्षण याकडे प्रामुख्याने भर देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

पुणे प्राईम न्यूज



## संक्षिप्त

### महाराष्ट्रद्रोही निशिकांत दुबे तुमचा जावई आहे का? रोहिणी खडसे यांचा संताप



**पुणे, ता. १६ :** बारा ज्योतिर्लिंगांमधील एक क्षेत्र असलेले भीमाशंकर मंदिर दुरुस्तीसाठी अडीच महिन्यांपासून बंद आहे. भाविकांना तिथे दर्शनासाठी प्रवेश नाही. तरीही भाजपचे खासदार डॉ. निशिकांत दुबे यांना मंदिर खुले करून दर्शनाची विशेष व्यवस्था केली गेली. त्याबद्दल तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनीही या प्रकाराबद्दल तीव्र संताप व्यक्त करत, महाराष्ट्रद्रोही निशिकांत दुबे काय तुमचा जावई आहे का, असा सवाल केला आहे. भीमाशंकर मंदिर सभामंडप व पायरी मार्गाच्या बांधकामासाठी ९ जानेवारीपासून दर्शनासाठी बंद आहे. मात्र झारखंडमधून हेलिकॉप्टरने आलेल्या खासदार दुबे यांना व्हीआयपी दर्शन दिले गेले. त्यावरून रोहिणी खडसे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून टीका केली आहे. मराठी लोगो को पटक पटक केमारेंगे असे म्हणतात त्या खासदार दुबे यांना पायघडया का, असे खडसे यांनी त्यात नमूद केले आहे.



### झाडांच्या खोडात खिळ्यांनी ठोकलेत लोकांचे फोटो; बाहुल्या, बिबव्यांनी वाढवली दहशत

**नाशिक, ता. १६ :** 'दक्षिण काशी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाशिकच्या पावन तपोवन भूमीत एक अंगावर काटा आणणारा प्रकार उघडकीस आला आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याची तयारी सुरू असतानाच, या परिसरातील वृक्षांचा वापर अंधश्रद्धेच्या आणि जादूटोण्याच्या घृणास्पद कृत्यांसाठी केला जात असल्याचे समोर आले आहे.गेल्या काही दिवसांपासून तपोवन परिसर वृक्षतोडीच्या मुद्द्यावरून आधीच चर्चेत होता. कुंभमेळ्याच्या नियोजनासाठी झाडे तोडण्याला पर्यावरणप्रेमींनी तीव्र विरोध दर्शवत आंदोलने सुरू केली होती. दरम्यान, आता परिसरातील झाडांवर व्यक्तींचे फोटो, बिब्बे आणि काळ्या बाहुल्या खिळ्यांनी ठोकल्याचे आढळल्याने संपूर्ण नाशिकमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण पसरले आहे. एखाद्या व्यक्तीला किंवा कुटुंबाला शारीरिक किंवा मानसिक इजा पोहोचवण्यासाठी 'करणी' किंवा 'भानामती' करण्याच्या उद्देशाने हे प्रकार केले जातात. एखाद्या व्यक्तीचा द्वेष किंवा मत्सर यातून असे प्रकार घडतात. दरम्यान, याप्रकरणी आता अधिक तपास सुरु आहे.

# जल सुरक्षा व ऊर्जा सुरक्षेने शेतीत समृद्धी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**अहिल्यानगर, ता. १६ :** मागेल त्याला ठिबक तसेच तुषार सिंचन व सौर ऊर्जेतून शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज अशी जलसुरक्षा व ऊर्जा सुरक्षा प्रदान केल्याने राज्यात शेती क्षेत्रात समृद्धी आल्याची उत्पादनात माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. महात्मा फुले कृषी विद्यापीठ रविवारी आयोजित ३९ व्या पदवीदान समारंभामध्ये मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

यावेळी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते फडणवीस यांचा डॉक्टर ऑफ सायन्स पदवीने गौरव करण्यात आला. समारंभास विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आयसीएआरचे निवृत्त





संचालक डॉ. अशोक कुमार सिंग, कुलगुरू व्ही. के खर्चे, कुलसचिव राजेंद्र कुमार पाटील, अकोला कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, परभणी कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी, दापोली कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे, नागपूर येथील म्हाफसूचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, अधिष्ठाता साताप्पा खरबडे, दत्तात्रय उगले, डॉ. प्रशांत बोडके, डॉ. गोरक्ष ससाणे, डॉ. सचिन नलावडे, सदाशिव पाटील, स्वाती निकम खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार हेमंत ओगले, उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, राज्य सरकारने हजार गावांमध्ये जलयुक्त शिवार योजना राबवली. भारत सरकारने आपल्या अहवालामध्ये या गावांमध्ये पाणीपातळीत लक्षणीय वाढ झाल्याचे निरीक्षण नोंदवले. हवामानातील बदल हे राज्यातील शेतकऱ्यांपुढील सर्वात मोठे संकट आहे. यंदाही कमी पाऊसमानाचा अंदाज आहे. अशावेळी शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाची जोड आवश्यक आहे. जैवतंत्रज्ञानाद्वारे प्रतिकूल हवामानात तग धरू शकतील असे वाण विकसित करणे ही विद्यापीठांसमोरील जबाबदारी आहे.

**अहिल्यानगरमध्ये सर्वाधिक शेततळे**

मागेल त्याला शेततळे या योजनेमध्ये अहिल्यानगर जिल्ह्याने राज्यात आघाडी घेतली आहे. पावसाचा प्रत्येक थेंब जिरवल्याने फळ उत्पादनात राज्याने प्रगती केली. मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेमध्ये १६ हजार मेगावॅट ऊर्जा निर्मिती वर्षाअखेरीस होणार आहे.

**महाविस्तार एआय एप**

राज्य सरकारने कृषी क्षेत्रात महाविस्तार एआय एप तयार केले आहे. ३० लाख शेतकऱ्यांना त्यात जोडण्यात आले आहे. हवामान अंदाज, किड नियंत्रण यावर शेतकऱ्यांना पद्वारे मार्गदर्शन केले जाते. मुंबईत झालेल्या एआय शिखर संमेलनात राज्याला शेती क्षेत्रातील एआय वापराच्या सादरीकरणाची संधी मिळाली, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

शेतकऱ्यांना त्यातून दिवसा १२ तास मोफत वीज मिळू शकेल, असे फडणवीस म्हणाले.

राज्यपाल वर्मा म्हणाले, भारतीय कृषीचे भविष्य तंत्रज्ञानाधीष्टीत उपाय, स्टार्टप्स, कृषी उद्योग व्यवस्थापन आणि शाश्वत शेती पद्धतीमध्ये दडलेले आहे. शिक्षणाचा उपयोग केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी नाही तर ग्रामीण समाज उन्नतीसाठी व्हावा. कृषिमंत्री भरणे यांनी विद्यार्थ्यांना केवळ नोकरीमागे न लागता उद्योग, व्यवसाय उभारण्याचे आवाहन केले.

# पुण्यात मेट्रोचे २०० किलोमीटर जाळे उभारणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे, ता. १६ :** पुणे हे देशातील अत्यंत वेगाने वाढणारे शहर असून, येथील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. भविष्यात पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए क्षेत्रात एकूण २०० किलोमीटरचे मेट्रोचे जाळे उभारण्याचा आमचा मानस आहे, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पुण्यातील मेट्रो भवनच्या उद्घाटनप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महापौर मंजुषा नागपुरे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार योगेश टिळेकर, भीमराव तापकीर, सुनील कांबळे,



हेमंत रासने, बापू पठारे, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार आणि महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आदी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, पुणे मेट्रोचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. शिवाजीनगर ते हिंजवडी हा मार्ग लवकरच प्रवाशांच्या सेवेत येईल, ज्यामुळे पुणेकरांचा मोठा प्रवास सुखकर होईल. हा मार्ग सुरू झाल्यानंतर शहरात जवळपास ५५ किलोमीटरचे मेट्रो मार्ग कार्यान्वित असतील. याशिवाय, पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या विविध भागांत आणखी ५५ किलोमीटरच्या मार्गांचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. याव्यतिरिक्त ८० किलोमीटरचे अतिरिक्त नियोजन असून, भविष्यात एकूण २०० किलोमीटरचे मेट्रो नेटवर्क उभे करण्याचे लक्ष सरकारने ठेवले आहे. मेट्रो प्रशासनाने आता टप्प्या-टप्प्याचे नियोजन न करता संपूर्ण क्षेत्राचा एकत्रित आराखडा तयार करा, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

**गॅसचा तुटवडा नाही, काँग्रेस अफवा पसरवतेय**

अमेरिका इस्त्रायल आणि इरणमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे पुण्यासह राज्यात सिलिंडरसाठी मोठ्या प्रमाणात रांगा लागत आहेत. यावर विचारलेल्या प्रश्नांवर बोलताना फडणवीस म्हणाले, देशात किंवा राज्यात कुठेही गॅसचा तुटवडा नाही.

राहुल गांधी आणि काँग्रेसचे नेते जाणीवपूर्वक चुकीची माहिती पसरवून नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण करत आहेत. नागरिकांनी कोणत्याही अफवांना बळी पडू नये, गॅस एजन्सीबाहेर रांगा लावू नयेत आणि गर्दी करू नये, असे आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी केले.

# तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्री यांचा आत्महत्येचा प्रयत्न

**अहिल्यानगर, ता. १६ :** पाथर्डी- बीडच्या हद्दीवर असलेल्या तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्री यांनी आज सायंकाळी स्वतः वरच वार केले. त्यामुळे त्यांना रक्तस्राव मोठ्या प्रमाणावर झाला. जखमी अवस्थेत अहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले. त्यांच्यावर शस्त्रक्रिया केल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यांची तब्येत आता स्थिर असून भाविकांनी रुग्णालया बाहेर गर्दी करू नये असे आवाहन करण्यात आले आहे.

महाराजांनी नेमके स्वतः वरच वार का केले? याचे कारण समजू शकले नाही. मात्र, महाराजांची तब्येत ठीक झाल्यानंतर ते स्वतःच याबाबत स्पष्टीकरण देतील, असे भाजपचे युवा नेते अक्षय कर्डिले यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. यावेळी आमदार



मोनिका राजळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी रुग्णालयात धाव घेतली.

दरम्यान, आदिनाथ शास्त्री यांनी स्वतःच व्हिडिओ करून आपली तब्येत आता ठीक असल्याचे सांगत भाविकांनी काळजी करू नये. मी लवकरच तारकेश्वर गडावर येईल, असे आवाहन केले आहे. दरम्यान, आदिनाथ शास्त्री यांना मानणारा बीड आणि अहिल्यानगर जिल्ह्यात मोठा परिवार आहे.

# लोणी काळभोरसह यवत परिसरातील घरफोडींचा अखेर उलगडा; सराईत गुन्हेगारासह तिघे अटकेत

**यवत, ता. १६ :** दौंड तालुक्यातील यवत परिसरात गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या घरफोडीच्या मालिकेला अखेर यवत पोलिसांनी आळा घातला आहे. पोलिसांनी धडक कारवाई करत सराईत गुन्हेगारासह तीन आरोपींना अटक केली असून या टोळीने केलेल्या सुमारे ९ ते १० घरफोडीच्या घटना उघडकीस आल्या आहेत. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ६ जानेवारी २०२६ रोजी पहाटे सुमारे ५.१५ वाजण्याच्या सुमारास दौंड तालुक्यातील वाखारी गावात अज्ञात चोरट्यांनी एका घराचा दरवाजा उचकटून आत प्रवेश केला. घरातील लोखंडी कपाट फोडून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण लाख ९८ हजार ६७१ रुपयांचा ऐवज चोरून नेण्यात



आला. त्याच रात्री शेजारच्या घरातही चोरीचा प्रयत्न झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

या घटनेनंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. तसेच गुप्त माहितीच्या आधारे संशयितांवर लक्ष ठेवण्यात आले. त्यानंतर सापळा रचून पोलिसांनी रुकुल उर्फ अमर दशरथ चव्हाण (वय -३१) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपल्या साथीदारांसह घरफोड्या केल्याची कबुली दिली. त्यानंतर महेश संभाजी भोसले (वय-२२) आणि अमोल शास्त्री भोसले (वय-२०) या दोघांनाही अटक करण्यात आली.

पोलिस तपासात या तिघांनी मिळून यवत पोलीस स्टेशन हद्दीत ६ आणि लोणी काळभोर परिसरात ३ अशा एकूण ९ ते १० घरफोड्या केल्याची कबुली दिली आहे. चोरी केलेले सोन्याचे दागिने त्यांनी अहिल्यानगर येथील एका सराफाला विकल्याचेही उघड झाले असून त्या सराफालाही या प्रकरणात आरोपी करण्यात आले आहे.

मुख्य आरोपी अमर चव्हाण हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर घरफोडी, दरोडा, जबरी चोरी व आर्म ॲक्ट अंतर्गत १० पेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत. विशेष म्हणजे त्याच्यावर मोका अंतर्गत दोन प्रकरणे नोंद असून तो काही गुन्ह्यांमध्ये फरार होता. दरम्यान, गेल्या काही काळात ग्रामीण भागात घरफोडीच्या घटना वाढल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती. मात्र या कारवाईमुळे पोलिसांनी घरफोडींचा उलगडा करत सराईत टोळीचा पर्दाफाश केला आहे. दरम्यान, नागरिकांनी घरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, मजबूत कुलूप व्यवस्था ठेवणे व शेजारी सतर्कता राखणे आवश्यक असल्याचे आवाहन केले आहे.

# कदमवाकवस्ती येथे कामगाराची गळफास घेऊन आत्महत्या

**लोणी काळभोर, ता. १५ :** कदमवाकवस्ती (ता. हवेली) येथील पठारे वस्ती परिसरात सेंटरिंगचे काम करणाऱ्या एका मजुराने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. शनिवारी (ता. १४) सकाळी सुमारे नऊच्या सुमारास ही घटना समोर आली. या आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसल्याने परिसरात विविध चर्चांना उधाण आले आहे.

जितेंद्र गोविंद मात्रे (वय ४१) असे आत्महत्या केलेल्या मजुराचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जितेंद्र मात्रे हे विवाहित असून त्यांना दोन मुले आहेत. ते बांधकाम क्षेत्रात सेंटरिंगचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत



होते. मात्र त्यांना दारूचे व्यसन होते. यामुळे त्यांच्या कुटुंबात वारंवार वाद होत होते. या सततच्या वादामुळे कंटाळून त्यांची पत्नी वर्षभरापूर्वी दोन मुलांना घेऊन माहेरी निघून गेली होती. त्यानंतर जितेंद्र मात्रे हे घरात एकटेच राहत होते.

शनिवारी सकाळी त्यांच्या घराचा दरवाजा आतून बंद असल्याचे शेजाऱ्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी आवाज देऊन तसेच दरवाजा ठोठावून पाहिले, मात्र आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. संशय आल्याने स्थानिक नागरिकांनी याबाबत लोणी काळभोर पोलिसांना माहिती दिली.

या घटनेची माहिती मिळताच, सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश बोराटे, पोलीस हवालदार महेश करे व सहकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी नागरिकांच्या मदतीने घराचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला असता जितेंद्र मात्रे हे साडीच्या साहाय्याने अँगलला गळफास घेतलेल्या अवस्थेत लटकलेले आढळून आले. पोलिसांनी त्यांना तत्काळ लोणी काळभोर येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी करून उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.

दरम्यान, लोणी काळभोर पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पुण्यातील रुग्णालयात पाठविला आहे. शवविच्छेदन अहवालानंतर आत्म हत्येचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. या घटनेचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार महेश करे करत आहेत.

# शनिवारवाड्याला मूळ स्वरूपात सात मजली उभारण्यात यावा

## हेमंत रासनेंची विधानसभेत मागणी

**पुणे, ता. १६ :** शनिवारवाडा ऐतिहासिक वास्तूचे १८२८ साली लागलेल्या भीषण आगीत मोठे नुकसान झाले होते. त्यानंतर वाड्याचे मूळ वैभव हरपले, ही अत्यंत वेदनादायी बाब आहे. राज्यातील गडकिल्ल्यांचे संवर्धन आणि जतन करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. त्याच धर्तीवर ऐतिहासिक प्रतीक असलेल्या शनिवारवाड्यालाही पुनर्वैभव प्राप्त करून देण्यासाठी मूळ स्वरूपात सात मजली उभारण्यात यावा, अशी मागणी आमदार हेमंत रासने यांनी विधानसभेत केली आहे.

कसबा मतदारसंघातील विविध प्रश्नांकडे आमदार हेमंत रासने यांनी विधानसभेचे लक्ष वेधले. यावेळी शनिवारवाडा-स्वारगेट तसेच सारसबाग-शनिवारवाडा या प्रस्तावित भुयारी मार्गांचा सविस्तर



प्रकल्प अहवाल तातडीने तयार करून पुणे शहरातील पहिला भुयारी मार्ग प्रत्यक्षात आणावा, तसेच मामलेदार कचेरी परिसरात थोर क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांच्या राष्ट्रीय स्मारकासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून आवश्यक तरतूद करण्यात यावी, अशी मागणी रासने यांनी केली.

कसबा मतदारसंघात शेकडो जुने वाडे आहेत. मात्र यूडीसीपीआर नियमावलीतील काही अटींमुळे या वाड्यांच्या पुनर्विकास प्रक्रियेत अनेक अडचणी निर्माण होत आहेत.

त्यामुळे येथे राहणाऱ्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी या नियमावलीत आवश्यक त्या सुधारणा करण्याची गरज आहे. पालिका कर्मचाऱ्यांच्या वसाहतींमधील अनेक इमारती धोकादायक अवस्थेत आहेत. या पार्श्वभूमीवर नगरविकास विभागाच्या माध्यमातून त्यांच्या पुनर्विकासाचा प्रकल्प तातडीने हाती घ्यावा असे रासने यांनी विधानसभेत सांगितले.

# गॅस टंचाईबाबत केंद्र–राज्य सरकार भूमिका का नाही स्पष्ट करत? खासदार सुप्रिया सुळे यांचा सवाल

**बारामती, ता. १६ :** महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांमध्ये एलपीजी गॅस सिलिंडरची टंचाई निर्माण झाल्याचा गंभीर मुद्दा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला आहे. या परिस्थितीबाबत केंद्र आणि राज्य सरकार स्पष्टपणे का बोलत नाहीत, असा सवालही त्यांनी केला. या टंचाईमुळे उद्योग, घरगुती व्यवसाय आणि सामान्य नागरिकांचे दैनंदिन आयुष्य प्रभावित होत असल्याचे त्यांनी सांगितले.

सुप्रिया सुळे यांनी सांगितले की, व्यावसायिक गॅस सिलिंडरवर अवलंबून असलेल्या अनेक व्यवसायांचे कामकाज विस्कळीत झाले आहे. गॅस पुरवठा कमी झाल्याने अनेक आस्थापनांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पुणे जिल्ह्यातील काही उद्योगांवर याचा थेट परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले. धायरी परिसरातील पॉलिया तयार करणाऱ्या युनिट्सचे उदाहरण देताना सुळे म्हणाल्या की, या उद्योगांतून हिंजवडीतील कंपन्यांना पुरवठा केला जातो. मात्र गॅसचा पुरवठा कमी झाल्यामुळे या उद्योगांचे जवळपास निम्मे काम मंदावले आहे.

बारामतीमध्येही अनेक लघुउद्योग आणि खानावळी कमर्शियल गॅसवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. गॅस टंचाईमुळे काही हॉटेल आणि लहान व्यवसायांना तात्पुरते बंद ठेवावे लागल्याचे त्यांनी सांगितले. दौंड आणि इंदापूरसारख्या



शहरांमध्येही परिस्थिती गंभीर असल्याचे सुळे म्हणाल्या. गॅस पुरवठा कमी झाल्यामुळे काही उद्योगांनी कामकाज कमी केले असून अनेक ठिकाणी कामगारांची संख्या घटवण्यात आली आहे.

ही टंचाई केवळ उद्योगांपुरती मर्यादित नसून घरगुती व्यवसायांवरही त्याचा परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले. घरातून अन्नपदार्थ बनवून विकणाऱ्या अनेक लहान व्यवसायिकांना गॅस सिलिंडर मिळत नसल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक नागरिकांना सिलिंडरसाठी लांबच लांब रांगा लावाव्या लागत असल्याचेही त्यांनी नमूद केले. सुळे यांच्या मते ही समस्या केवळ एका जिल्ह्यापुरती मर्यादित नसून राज्यातील अनेक शहरांमध्ये ती जाणवत आहे. बारामती, जळगाव, नागपूर, पुणे, नाशिक आणि मुंबईसह अनेक ठिकाणी गॅस टंचाईबाबत तक्रारी येत असल्याचे त्यांनी सांगितले.

अधिकृत स्तरावर पुरवठा सुरळीत असल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्ष परिस्थिती त्याला विरोधाभासी असल्याचे त्यांनी नमूद केले. यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असल्याचेही त्या म्हणाल्या. या प्रश्नाकडे राजकीय दृष्टिकोनातून पाहू नये, असे आवाहनही त्यांनी केले. परिस्थिती समजून घेण्यासाठी केंद्र सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावावी आणि सर्व नेत्यांना परिस्थितीची माहिती द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

दरम्यान, जर गॅस पुरवठ्यात अडचणी असतील तर त्यावर सरकारची नेमकी कृती योजना काय आहे, हे स्पष्ट केले पाहिजे, असेही सुळे म्हणाल्या. महाराष्ट्रातील अनेक कुटुंबे, लघुउद्योग आणि कामगार गॅस पुरवठ्यातील अडथळ्यांमुळे अनिश्चिततेचा सामना करत आहेत. अशा वेळी पारदर्शकता आणि स्पष्ट धोरण अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.



# दौंड एसआरपीएफ गट क्र.५ची भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक : सचिन डहाळे

**सागर जगदाळे**

भिगवण, ता. १६ : दौंड येथील राज्य राखीव पोलीस बल (एसआरपीएफ) गट क्रमांक ५ येथे सुरू होणाऱ्या पोलीस भरती प्रक्रियेस मोठा प्रतिसाद मिळाला असून तब्बल २४ हजार ४३६ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. त्यापैकी १०४ उमेदवारांची निवड करण्यात येणार असल्याची माहिती सहाय्यक समादेशक सचिन डहाळे यांनी दिली.

ही भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येणार असून दररोज पहाटे ४ ते सकाळी ९ या वेळेत चाचण्या घेतल्या जाणार आहेत. दररोज सुमारे १२०० उमेदवारांना शारीरिक चाचणीसाठी बोलावण्यात येणार असून ही प्रक्रिया १६ एप्रिलपर्यंत सुरू राहणार आहे.

भरती प्रक्रियेत कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी आरएफआयडी प्रणालीचा वापर करण्यात येत असून संपूर्ण प्रक्रियेवर काटेकोर देखरेख ठेवण्यात आली आहे. तसेच भरतीसाठी येणाऱ्या उमेदवारांसाठी राहण्याची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, अल्पोपहार आणि वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

उमेदवारांनी कोणत्याही प्रकारच्या आमिषाला बळी न पडता व गैरप्रकार टाळून प्रामाणिकपणे भरती प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन सहाय्यक समादेशक सचिन डहाळे यांनी केले.

# ई-केवायसी शिवाय गॅस मिळणार नाही; गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर केंद्राचा निर्णय




**नवी दिल्ली, ता. १६ :** घरगुती एलपीजी ग्राहकांसाठी आधार आधारित बायोमेट्रिक प्रमाणीकरण (ई-केवायसी) अनिवार्य करण्यात आल्याची माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने शनिवारी दिली. सर्व घरगुती गॅस ग्राहकांनी ही पूर्ण करणे आवश्यक असल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार ग्राहकांना आपल्या संबंधित ऑइल मार्केटिंग कंपनीच्या मोबाईल ॲपद्वारे आणि आधार फेसआरडी ॲपच्या मदतीने घरबसल्या ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. याशिवाय कोणतीही अडचण असल्यास ग्राहकांनी आपल्या एलपीजी वितरकाशी संपर्क साधावा, असेही सांगण्यात आले आहे. तसेच मदतीसाठी टोल-फ्री हेल्पलाईन क्रमांकही उपलब्ध करून देण्यात आला आहे.

दरम्यान, पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशातील अनेक शहरांमध्ये एलपीजी सिलिंडरचा पुरवठा कमी झाल्याचे चित्र आहे. अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांनंतर निर्माण झालेल्या संघर्षामुळे पश्चिम आशियातील महत्त्वाच्या होर्मुझ सामुद्रधुनीतून जहाजांची वाहतूक ठप्प झाली आहे. त्यामुळे एलपीजीच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. या परिस्थितीचा परिणाम गॅसच्या दरांवरही झाला आहे. दिल्लीमध्ये १४.२ किलो वजनाच्या घरगुती एलपीजी सिलिंडरची किंमत ८५३ रुपयांवरून ९१३ रुपयांपर्यंत वाढली असून त्यात ६० रुपयांची वाढ झाली आहे. तर १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरची किंमत ११५ रुपयांनी वाढून १,८८४.५० रुपयांवर पोहोचली आहे.

गॅस टंचाईमुळे नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली असून मोठ्या प्रमाणावर सिलिंडर साठवण्याच्या घटनाही समोर येत आहेत. कर्नाटकातील केंगेरी परिसरात पोलिसांनी एका ३० वर्षीय व्यक्तीला विविध कंपन्यांचे एलपीजी सिलिंडर साठवून जास्त दराने विक्री करण्याच्या आरोपाखाली अटक केली आहे. दिल्लीमध्येही गॅसचा साठा करून काळाबाजार होऊ नये म्हणून पोलिसांनी कडक उपाययोजना केल्या आहेत. सिलिंडर डेपोवर चोवीस तास पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून सर्व कर्मचाऱ्यांची नियमित रजा रद्द करण्यात आली आहे.

दरम्यान, परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी दिल्ली सरकारने व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या पुरवठ्यावरही मर्यादा घातली आहे. शहरातील सरासरी दैनंदिन वापराच्या केवळ २० टक्के इतकाच नियंत्रित पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# शिंदेसेनेचे शहरप्रमुख नाना भानगिरे यांच्यासह १० जणांवर गुन्हा; ३७ कोटींची फसवणूकीचा आरोप

**पुणे, ता. १६ :** महंमदवाडी परिसरातील सुमारे ३०० कोटी रुपये बाजारमूल्य असलेल्या जमिनीच्या विकास करारात तब्बल ३७ कोटी ४९ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी शिंदेसेनेचे शहरप्रमुख प्रमोद ऊर्फ नाना भानगिरे आणि सिद्धांत भानगिरे यांच्यासह एकूण दहा जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरू आहे.

बांधकाम व्यावसायिक विश्वजित सुभाष झंबर (वय-५६, रा. कोरेगाव पार्क) यांनी कोरेगाव पार्क पोलिस ठाण्यात याबाबत फिर्याद दिली आहे. त्यानुसार गोयल, पटेल आणि ठकवाणी डेव्हलपर्स या भागीदारी संस्थेचे भागीदार राजेंद्र सीताराम गोयल, जयेश पुरुषोत्तम पटेल, विपुल वल्लभ पटेल, तसेच पूनम रूफिंग प्रा. लि.चे संचालक वल्लभभाई पटेल, सत्येन पटेल, जिग्नेश पटेल, प्रमोद वसंत भानगिरे, सिद्धांत भानगिरे यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २०११ ते २४ जानेवारी २०२५ दरम्यान हा प्रकार महंमदवाडी आणि कोरेगाव पार्क परिसरात घडला. आरोपींनी फिर्यादींना मोठ्या नफ्याचे आमिष दाखवत महंमदवाडीतील सुमारे एकर जमिनीच्या विकसन करारासाठी तसेच ८.५८ एकर जमिनीच्या समजुतीच्या करारासाठी एकूण २२ कोटी रुपये स्वीकारले. त्यानंतर प्रकल्पासाठी आणखी १५ कोटी ४८ लाख रुपये खर्च करण्यासही फिर्यादींना भाग पाडण्यात आल्याचा आरोप आहे.

मात्र, जमिनीचे टायटल क्लिअर करून देण्यात आले नाही तसेच एस्क्रो




करारनामा करण्यात आला नाही. उलट विकास प्रक्रियेत जाणीवपूर्वक अडथळे निर्माण करण्यात आले. एवढेच नव्हे तर सर्व्हे नंबर १८/१/१ मधील १२ गुंठे जमीन फिर्यादींच्या संमतीशिवाय प्रमोद नाना भानगिरे व इतरांना विकण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. या व्यवहारासाठी सुरुवातीला कोणताही मोबदला देण्यात आला नव्हता. नंतर हा व्यवहार कायदेशीर भासविण्यासाठी २८ डिसेंबर २०२५ रोजी ९६ लाख रुपये स्वीकारल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. या संपूर्ण व्यवहारात तृतीय पक्षाचा स्वारस्य निर्माण करून फिर्यादींचा हक्क डावलण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. तसेच यूएलसीचा बनावट आदेश तयार करून हा व्यवहार केल्याचाही तपासात उल्लेख आहे.

दरम्यान, या प्रकरणात अटकपूर्व जामीन मिळावा, यासाठी वल्लभ लालजी पटेल यांच्यासह सात जणांनी न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मात्र, गुन्ह्याची व्याप्ती मोठी असल्याने आरोपींची पोलिस कोठडी आवश्यक असल्याचे सांगत आर्थिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक संतोष डांगे यांनी न्यायालयात जामीन अर्जाला विरोध केला आहे.

# वरिष्ठ शिक्षकांना टीईटीमधून सूट द्यावी; खासदार धनंजय महाडिकांची संसदेत मागणी

**नवी दिल्ली, ता. १६ :** 'शिक्षक पात्रता परीक्षा' म्हणजेच TET च्या जाचक अटीतून २० ते २५ वर्षे सेवा बजावलेल्या अनुभवी शिक्षकांना कायमस्वरूपी सूट देण्यात यावी, अशी आग्रही मागणी भाजप खासदार धनंजय महाडिक यांनी राज्यसभेच्या अधिवेशनात केली आहे. देशाच्या कानाकोपऱ्यात ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या लाखो ज्येष्ठ शिक्षकांच्या अस्तित्वाचा आणि सन्मानाचा प्रश्न आता थेट संसदेत मांडण्यात आला आहे.




'शिक्षण हक्क कायदा २००९' (RTE) नुसार, इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्व शिक्षकांसाठी ढएढ परीक्षा अनिवार्य करण्यात आली आहे. शिक्षणाचा दर्जा सुधारणे हा सरकारचा यामागचा मूळ हेतू असला तरी, अनेक वर्षांपासून सेवेत असलेल्या शिक्षकांसाठी ही अट 'फास' ठरत आहे. ज्या शिक्षकांनी आपली उभी हयात विद्यार्थ्यांना घडवण्यात घालवली, त्यांना आता निवृत्तीच्या उंबरठ्यावर असताना पुन्हा परीक्षेला बसण्याची सक्ती केली जात आहे.

खासदार महाडिक यांनी मांडलेला मुद्दा अत्यंत कळीचा आहे. ज्या शिक्षकांनी दोन ते अडीच दशके अध्यापन केले आहे, त्यामुळे त्यांचा दांडगा अनुभव हीच त्यांची मोठी पात्रता आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. सरसकट सर्वांनाच एकाच मापात तोलणे अन्यायकारक असल्याचे सांगत त्यांनी काही महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले.

हा केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे, तर देशातील लाखो शिक्षकांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. जर या अनुभवी शिक्षकांना सूट मिळाली, तर त्यांचा दांडगा अनुभव शिक्षण क्षेत्राला अधिक समृद्ध करेल. केवळ कागदी पदव्यांपेक्षा 'अनुभवाचे मूल्य' लक्षात घेऊन निकष बदलावेत, अशी मागणी आता जोर धरत आहे.

दरम्यान, सध्याच्या नियमांनुसार, नवीन शिक्षक भरतीसाठी ढएढ अनिवार्य आहेच, पण जुन्या शिक्षकांच्या बाबतीत अद्याप संभ्रमावस्था आहे. केंद्र सरकारने जर महाडिक यांच्या मागणीवर सकारात्मक निर्णय घेतला, तर ज्येष्ठ शिक्षकांना मोठा कायदेशीर दिलासा मिळू शकतो.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## नैराश्याच्या गर्तेतून बाहेर पडण्याचे ५ सोपे उपाय

**पुणे, ता. १६ :** आजच्या 'हाय-स्पीड' जगात माणसाचं मन सतत विचारांच्या चक्रात अडकलेलं असतं. कामाचा ताण, सोशल मीडियावरील तुलना आणि भविष्याची चिंता यामुळे अनेकांना 'कायम नकारात्मक वाटणे' किंवा 'खूप जास्त निगेटिव्हिटी येणे' या समस्येचा सामना करावा लागत आहे. ही केवळ एक भावना नसून ती तुमच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर परिणाम करणारी धोक्याची घंटा असू शकते.

नकारात्मकता का येते?

मानसशास्त्रज्ञांच्या मते, मानवी मेंदू हा धोक्यांकडे जास्त आकर्षित होतो. जेव्हा आपण सतत नकारात्मक बातम्या पाहतो किंवा आपल्या अपयशाचा वारंवार विचार करतो, तेव्हा मेंदूला तशीच सवय लागते. यामध्ये सोशल मीडियाचा वाटा मोठा आहे; दुसऱ्याचं चकाकणारं आयुष्य पाहून आपल्याला स्वतःच्या आयुष्याबद्दल न्यूनगंड वाटू लागतो, जो नकारात्मकतेचं मुख्य कारण ठरतो.

हे का महत्त्वाचे आहे?

जर नकारात्मकतेवर वेळीच उपाय केला नाही, तर त्याचे रूपांतर निद्रानाश, उच्च रक्तदाब आणि तीव्र नैराश्यातहोऊ शकते. त्यामुळे मन प्रसन्न ठेवणे ही आता चैनीची गोष्ट नसून ती जगण्याची गरज बनली आहे.

नकारात्मकतेवर मात करण्याचे प्रभावी मार्ग

'डिजिटल डिटॉक्स' करा: दिवसभरातून किमान १तास मोबाईलपासून पूर्णपणे लांब राहा. सकाळी उठल्याबरोबर आणि रात्री झोपण्यापूर्वी सोशल मीडिया पाहणे टाळा. यामुळे मेंदूला विश्रांती मिळते.

कृतज्ञता व्यक्त करा : दिवसभरात घडलेल्या किमान ३ चांगल्या गोष्टी रात्री डायरीत लिहा. मग ती गोष्ट अगदी छोटी का असेना (उदा. कोणाचे तरी लाभलेले हास्य किंवा वेळेवर मिळालेली बस). यामुळे तुमची दृष्टी 'काय नाही' याकडून 'काय आहे' याकडे वळते.

५-मिनिटांचा निसर्ग सहवास: खूप जास्त विचार येत असतील, तर शांतपणे खिडकीबाहेर झाडांकडे पाहत बसा किंवा १० मिनिटे मोकळ्या हवेत चाला. निसर्गाशी नातं जोडल्यामुळे शरीरातील 'कोर्टिसोल' (स्ट्रेस हॉर्मोन) कमी होतो.

वर्तमानात जगा : नकारात्मक विचार बहुतेकदा 'भूतकाळ' किंवा 'भविष्यकाळ' याबद्दल असतात. जेव्हा मन भरकटतं, तेव्हा दीर्घ श्वास घ्या आणि सध्या तुम्ही जिथे आहात, तिथे लक्ष केंद्रित करा.

तज्ज्ञांची मदत घ्यायला संकोच करू नका: जर नकारात्मकता तुमच्या दैनंदिन कामात अडथळा आणत असेल, तर मानसोपचारतज्ज्ञांचा सल्ला घेणे यात काहीही गैर नाही. मन मोकळं करणं हाच अर्धा उपचार असतो.

# गावठी पिस्तुलांसह फिरणारे तिघे जाळ्यात

## दोन गावठी पिस्तुलांसह सहा जिवंत काडतुसे जप्त; शिरूर पोलिसांची कारवाई

**योगेश मारणे**

शिरूर, ता. १६ : अवैध गावठी पिस्तुल बाळगणाऱ्या आरोपींविरुद्ध शिरूर पोलिसांनी धडाकेबाज कारवाई करत तीन आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून दोन गावठी बनावटीची पिस्तुले व सहा जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. तसेच एक फोर्ड फिगो कार आणि एक पल्सर मोटारसायकल असा एकूण सुमारे ३ लाख ४५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (ता.१३) रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास पोलिस हवालदार विशाल कोथळकर यांना माहिती मिळाली की, निमोणे (ता. शिरूर) येथील नागेश्वर विद्यालयासमोर पांढऱ्या रंगाच्या फोर्ड फिगो कारमध्ये काही इसम गावठी पिस्तुल व जिवंत काडतुसे बाळगून थांबले आहेत. त्यानुसार पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक गोविंद खटिंग, हवालदार विशाल कोथळकर व पोलिस कर्मचारी सुशील सुरवसे यांनी तातडीने घटनास्थळी सापळा रचला.

पोलिसांनी संशयित कारची तपासणी केली असता, त्यामध्ये बसलेले समीर प्रकाश शेलार (वय -२३) व संपत गणपत दुर्गे (वय-३५, दोघेही रा. निमोणे, ता. शिरूर) यांना ताब्यात घेण्यात आले.कारमध्ये तपासणी केली असता हँडब्रेकखाली एक गावठी बनावटीचे पिस्तुल व त्याच्या मॅगझिनमध्ये एक जिवंत काडतूस आढळून आले. याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोन्ही आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता सोमवार (ता. १६) पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.



त्यानंतर दुसऱ्या दिवशी शनिवारी (ता. १४) सायंकाळी पेट्रोलिंग दरम्यान पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, सराईत गुन्हेगार नवनाथ साहेबराव गोरडे (वय -३८, रा. पोहेगाव खुर्द, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर) हा दुचाकीवरून अवैध पिस्तुल घेऊन शिरूरकडे येत आहे. त्यानुसार पोलिसांनी अहिल्यानगरपुणे महामार्गावर सापळा लावला. दरम्यान भरधाव वेगात येणारी मोटारसायकल खासगी वाहनाला धडकून पडल्याने मागे बसलेला इसम पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.

तपासणी केली असता त्याच्या कमरेला एक गावठी बनावटीचे पिस्तुल व मॅगझिनमध्ये पाच जिवंत काडतुसे आढळून आली. चौकशीत ही पिस्तुल त्याने मोटारसायकलवर मागे बसलेल्या सागर बनसोडे (रा. राहता, अहिल्यानगर) यांच्याकडून विकत घेतल्याचे समोर आले. या कारवाईत शिरूर पोलिसांनी दोन गावठी पिस्तुले, सहा जिवंत काडतुसे, एक फोर्ड फिगो कार व एक पल्सर मोटारसायकल असा मुद्देमाल जप्त केला असून तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अपर पोलिस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले व पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक गोविंद खटिंग, शुभम चव्हाण, हवालदार विशाल कोथळकर तसेच पोलिस कर्मचारी नितेश थोरात, अक्षय कळमकर, सचिन भोई, सुशील सुरवसे, अजय पाटील, दादाराव नागरे, संदीप खेडकर, सागर बोराडे, विजय शिंदे, निखिल रावडे, रविंद्र काळे, निरज पिसाळ आदींच्या पथकाने केली.

# मोडनिंब येथील कला केंद्रावर पोलिसांचा छापा; ; टेंभुर्णी पोलिसांची कारवाई

## २५ पीडित महिलांची सुटका; तर सहा आरोपीवर कारवाई

**टेंभुर्णी, ता. १६ :** कला केंद्राच्या अडून सुरू असलेल्या वैश्या व्यवसायाचा पर्दापाश करीत टेंभुर्णी पोलिसांची मोठी कारवाई. एका महिलेसह सहा आरोपीना अटक करण्यात व तब्बल महिलांची सुटका करण्यात पोलिसांना यश आले आहे.आजवरची ही सर्वात मोठी कारवाई मानली जात असून यामध्ये परराज्यातील महिलांचा समावेश दिसून आला आहे.पाच आरोपींना पोलीस कोठडी ठोठावली आहे.

ही कारवाई मोडनिंब (ता.माढा) येथील स्वरांजली कला केंद्रात टेंभुर्णी पोलीस ठाण्यातील परिविक्षाधीन (भापोसे) अधिकारी राहुल आत्राम व त्यांच्या पथकाने १५ मार्च रोजी मध्यरात्री यशस्वीपणे पार पाडली.



पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मोडनिंब येथील स्वरांजली कला केंद्राच्या आडून वेश्या व्यवसाय चालवला जात असल्याची गोपनीय माहिती टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राहुल आत्राम यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी नियोजनबद्ध सापळा रचून १५ मार्च रोजी मध्यरात्री छापा टाकला. छाप्यात कला केंद्राचे मालक, व्यवस्थापक तसेच इतर काही जण महिलांकडून जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करून घेत असल्याचे उघड झाले.

या कारवाईदरम्यान पोलिसांना तेथे २५ महिला आढळून आल्या. यामध्ये परराज्यातील महिलांचाही समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. आर्थिक फायद्यासाठी संगनमताने हा व्यवसाय चालवला जात असल्याचे तपासात निष्पन्न झाले. पोलिसांनी सर्व महिलांची सुटका करून त्यांना संरक्षणात घेतले आहे. या प्रकरणी स्वरांजली कला केंद्राचे चालक जगन्नाथ तुकाराम घाडगे, व्यवस्थापक विशाल पवार, बाळासाहेब गिड्डे, छाया सुरवसे, रिक्षाचालक नितीन चव्हाण आणि स्वागत लॉजचा व्यवस्थापक सिद्धांत गायकवाड यांच्यासह एकूण सहा जणांना अटक करण्यात आली आहे. सर्व आरोपींविरुद्ध विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक अंजना कृष्णा व्ही.एस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. टेंभुर्णी पोलिसांच्या पथकाने केलेल्या या कारवाईमुळे परिसरात सुरू असलेल्या अवैध व्यवसायावर मोठा आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# अवघ्या पाच वर्षाच्या चिमुकल्याने पाळला रोजा

**आदित्य बोराटे**



इंदापूर, ता. १६ : त्याचं वय अवघं पाच वर्षाचं, तरी तो रविवारी पहाटे ५ वाजून १२ मिनिटांनी तो उठला, त्याने भक्तीभावाने नमाज अदा केला आणि सायंकाळी ६.५१मिनटांपर्यंत त्याने ना अन्न मागितले ना पाणी. तब्बल तेरा तासांहून अधिक काळ त्याने रोजा ठेवला आणि मग नमाज अदा करून इफ्तार केला. इतक्या छोट्या वयात अर्शान परवेज बागवान ह्याने ठेवलेल्या या रोजाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मुस्लीम बांधवांचा पवित्र रमजानचा महिना सुरू असून, आज पंचवीस रोजे (उपवास) पूर्ण झाले आहेत. यंदा रमजान ऐन उन्हाळ्यात आल्यामुळे रखरखत्या उन्हात पाण्याचा थेंबही न पिता जवळपास १४ ते १५ तास राहण्याची शक्तीच जणू देव या दिवसांमध्ये देत असल्याची भावना रोजा करणाऱ्यांमध्ये असते. त्यातून त्यांचा रोजा पूर्ण होतो. इंदापूर शहरातील बागवान गल्ली परिसरातील अर्शानने रोजा ठेवला आणि संपूर्ण १४ तास निर्जली राहिला, त्यामुळे त्याचे कौतुक होत आहे. रमजानचा महिना मुस्लिम धर्मियांसाठी सर्वात पवित्र असतो. या पवित्र महिन्याची सुरुवात चंद्राच्या दर्शनाने होते. रमजानचा महिना कधी २९ दिवसांचा असतो तर कधी ३० दिवसांचा असतो. रमजान सुरू होताच मुस्लिम लोकं रोजा सुरू करतात. यावर्षी हा पवित्र महिना १९ फेब्रुवारीपासून सुरू झाला आहे. रोजाची सुरुवात सकाळी सेहरीने होते आणि त्यानंतर संध्याकाळी इफ्तारने रोजा सोडला जातो.

# ट्रकच्या धडकेत कुंजीरवाडी येथील ज्येष्ठ महिलेचा मृत्यू

**लोणी काळभोर, ता. १६ :** पुणे-सोलापूर महामार्गावर रस्ता ओलांडताना ज्येष्ठ महिलेला ट्रकने दिलेल्या धडकेत महिलेचा जागीच मृत्यू झाला. कुंजीरवाडी (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीत शुक्रवारी (ता. १३) हि घटना घडली. अन्नपूर्णा गुरु (वय -६४, रा. मोरया सोसायटी, कुंजीरवाडी, पुणे-सोलापूर रस्ता) असे मृत्युमुखी पडलेल्या ज्येष्ठ महिलेचे नाव आहे. याबाबत अन्नपूर्णा यांचा मुलगा अभिजित (वय -३९) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी लोणी काळभोर पोलिसांनी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अन्नपूर्णा गुरु या गुरुवारी पुणे-सोलापूर महामार्गाने निघाल्या होत्या. त्या वेळी कुंजीरवाडी परिसरात रस्ता ओलांडणाऱ्या अन्नपूर्णा यांना




भरधाव ट्रकने धडक दिली. अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. दरम्यान, अपघातानंतर पसार झालेल्या ट्रक चालकाविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पोलीस उपनिरीक्षक योगेश पैठणे तपास करत आहेत. लोणी काळभोर व उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या हद्दीत मागील आठवडाभरात गंभीर स्वरुपाच्या अपघाताच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. वेगवेगळ्या अपघातात चौघांचा मृत्यू झाला आहे.

# स्वयंसेवी वैद्यकीय सेवेला प्रोत्साहन देण्यासाठी सीएमई क्रेडिट गुण प्रणाली

**मुंबई, ता. १६ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली ग्रामीण व दुर्गम भागात आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी कार्यरत असलेल्या वैद्यकीय तज्ज्ञांच्या स्वयंसेवी सेवेचा सन्मान आणि प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र वैद्यकीय परिषद सातत्याने सकारात्मक पाऊले उचलण्यात येत आहे.

याच अनुषंगाने स्वयंसेवी सेवेकरिता क्रेडिट गुण प्रणाली अधिक प्रभावी करण्यासाठी स्पष्ट व पारदर्शक धोरण राबविण्यात येत आहे. स्वयंसेवी सेवेसाठी सीएमई क्रेडिट गुण देण्याबाबत सखोल विचार करून परिषदेकडून सध्या अंमलात असलेल्या प्रणालीची माहिती स्पष्ट करण्यात आली आहे. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने मान्यताप्राप्त असलेल्या संघटना, संस्था, अध्यापन संस्था तसेच वैद्यकीय महाविद्यालयांना ठराविक निकष व मार्गदर्शक तत्वांनुसार



क्रेडिट गुण प्रदान करण्यात येत आहेत. यामुळे वैद्यकीय व्यावसायिकांचे ज्ञान अद्ययावत राहण्यासोबतच त्यांच्या सामाजिक बांधिलकीलाही चालना मिळत आहे.

ग्रामीण, आदिवासी व दुर्गम भागात शस्त्रक्रिया, वैद्यकीय शिबिरे किंवा आरोग्य सेवा देणाऱ्या परंतु अद्याप मान्यता नसलेल्या संस्था, संघटना किंवा रुग्णालयांसाठीही शासनाने स्पष्ट मार्ग खुला करून दिला आहे. अशा संस्थांनी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडून मान्यताप्राप्त केल्यानंतर त्यांनाही क्रेडिट गुण देण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.


या निर्णयामुळे एकीकडे वैद्यकीय सेवेच्या गुणवत्तेची खात्री राहणार असून, दुसरीकडे स्वयंसेवी आरोग्य उपक्रम अधिक शिस्तबद्ध, उत्तरदायी आणि परिणामकारक ठरणार आहेत. मान्यता प्रक्रियेमुळे वैद्यकीय शिबिरांचे नियोजन, उपचारांची गुणवत्ता आणि रुग्ण सुरक्षेला प्राधान्य मिळणार आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या या धोरणात्मक निर्णयामुळे राज्यातील वैद्यकीय व्यावसायिकांना स्वयंसेवी कार्याकडे अधिक प्रेरणा मिळणार असून, शासनाच्या सर्वांसाठी दर्जेदार आरोग्यसेवा या संकल्पनेला बळ मिळणार आहे. वैद्यकीय क्षेत्रातील सेवाभाव, कौशल्यवृद्धी आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा समतोल साधणारी ही सीएमई क्रेडिट गुण प्रणाली राज्याच्या आरोग्य व्यवस्थेसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

# अदानी टोटल गॅसची मोठी घोषणा, औद्योगिक ग्राहकांसाठी स्वस्त दरात गॅस पुरवणार

**पुणे, ता. १६ :** पश्चिम आशियातील तणावामुळे जागतिक ऊर्जा बाजारात अस्थिरता निर्माण झाली असताना अदानी टोटल गॅस लिमिटेडने औद्योगिक ग्राहकांसाठी दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. कंपनीने अतिरिक्त नैसर्गिक वायूच्या किमतीत मोठी कपात जाहीर केली असून ही नवी दररचना १६ मार्च २०२६ रोजी सकाळी ६ वाजल्यापासून लागू होणार आहे.

अदानी समूह आणि फ्रान्सच्या टोटल एनर्जीझ यांच्या संयुक्त उपक्रम असलेल्या अदानी टोटल गॅस लिमिटेडने औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांना पुरवण्यात येणाऱ्या अतिरिक्तगॅसचा दर ११९.९० रुपये प्रति स्टँडर्ड क्यूबिक मीटर वरून कमी करून ८२.९५ रुपये प्रति SCM केला आहे. अपस्ट्रीम गॅसच्या किमतीत झालेली घट आणि सध्याच्या




पुरवठा परिस्थितीचा विचार करून हा निर्णय घेण्यात आल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे. अलीकडील काळात पश्चिम आशियातील संघर्षामुळे हॉर्मुझ सामुद्रधुनीतून होणाऱ्या जहाज वाहतुकीवर परिणाम झाला होता. त्यामुळे भारताकडे येणाऱ्या द्रवरूप नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यावरही काही प्रमाणात परिणाम झाला. या पार्श्वभूमीवर कंपनीने यापूर्वी औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांना गॅस वापर सुमारे ४० टक्क्यांपर्यंत मर्यादित ठेवण्याचे निर्देश दिले होते. या मर्यादेपेक्षा जास्त वापर झाल्यास स्पॉट मार्केटच्या दराने शुल्क आकारले जात होते.

मात्र आता अपस्ट्रीम किमतीत घट झाल्यामुळे त्या लाभाचा काही भाग ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचा निर्णय कंपनीने घेतला आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, गॅस पुरवठ्यातील अडचणींच्या काळातही प्रणाली स्थिर ठेवणे आणि उपलब्ध गॅसचे संतुलित वितरण करणे हेही या निर्णयामागील महत्त्वाचे कारण आहे. कंपनीने ग्राहकांना पाठवलेल्या निवेदनात स्पष्ट केले आहे की, ३ मार्च २०२६ रोजी जाहीर केलेल्या दरांमध्ये सुधारणा करून अतिरिक्त गॅसचा दर कमी करण्यात आला आहे. या निर्णयामुळे औद्योगिक ग्राहकांना काही प्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता असून ऊर्जा खर्च कमी होण्यास मदत होईल, असे मानले जात आहे.

# भरधाव डंपरने दुचाकीला मागून ठोकरले; अपघातात आजोबा, नातीचा मृत्यू

**नसरापूर, ता. १६ :** पुण्याहून गावी निघालेल्या दुचाकीस्वार आजोबा आणि नऊ वर्षीय नातीचा भरधाव डंपरच्या धडक्त मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना भोर तालुक्यात घडली. या प्रकरणी डंपर चालका विरुद्ध भोर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

शिवाजी नामदेव शिळीमकर (वय ६९), तन्वी नितीन शिळीमकर (वय-९, दोघे रा. तांभाड, ता. भोर, जि. पुणे ) अशी मृत्यमुखी पडलेल्यांची नावे आहेत. या प्रकरणी डंपर चालक आकाश शिवाजी भूषणे (रा. मांजरी, हडपसर) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करुन त्याला अटक करण्यात आली. याबाबत पोलीस कर्मचारी सुधाकर शिळीमकर यांनी भोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवाजी शिळीमकर आणि कुटुंबीय हे सध्या कात्रज मधील आंबेगाव परिसरात राहायला आहेत. शिळीमकर कुटुंबीय मूळचे भोर तालुक्यातील तांभाड गावचे रहिवासी आहेत. शनिवारी ( मार्च) दुचाकीस्वार शिवाजी शिळीमकर हे नात तन्वी हिला घेऊन गावी निघाले होते.

तांभाड-नसरापूर मार्गावरील देऊळवाडी हातवे परिसरात भरधाव डंपरने दुचाकीला पाठीमागून धडक दिली. अपघातात दोघे जण गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळाताच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. दोघांना तातडीने खासगी रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच दोघांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. दरम्यान, अपघातात दुचाकीस्वार आजोबा आणि नऊ वर्षीय नातीचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाताच तांभाड गावात शोककळा पसरली.

# भीमसेन जोशी रुग्णालयाच्या आयसीयूमध्ये व्हेंटिलेटरवरील वृद्धेला उंदराने कुरतडले

**मुंबई, ता. १६ :** मिरा-भाईंदरमधील पंडित भीमसेन जोशी शासकीय रुग्णालयातून आरोग्य व्यवस्थेचे धिंडवडे काढणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. या रुग्णालयातील अतिदक्षता विभागात मृत्यूशी झुंज देत असलेल्या एका ८९ वर्षीय वृद्ध महिलेचा हात उंदराने कुरतडल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे शासकीय रुग्णालयातील रुग्णांच्या सुरक्षेचा आणि स्वच्छतेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

सुहासिनी दामोदर माठेकर (८९) असे या दुर्दैवी वृद्ध महिलेचे नाव आहे. प्रकृती




खालावल्यामुळे त्यांना १२ मार्च २०२६ रोजी या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना चौथ्या मजल्यावरील अतिदक्षता विभागात व्हेंटिलेटर सपोर्टवर ठेवण्यात आले होते. ज्या ठिकाणी अत्यंत स्वच्छता आणि डॉक्टरांचे चोवीस तास लक्ष असणे अपेक्षित असते, त्याच आयसीयू कक्षात रात्रीच्या वेळी उंदराने सुहासिनी यांच्या हाताला अक्षरशः कुरतडून काढले. सकाळी सहाच्या सुमारास जेव्हा नातेवाईक त्यांना भेटण्यासाठी गेले, तेव्हा त्यांना सुहासिनी यांच्या हातावर जखमा दिसल्या आणि जवळून उंदीर पळताना आढळला.

या प्रकारामुळे धक्का बसलेल्या नातेवाईकांनी तातडीने रुग्णालय प्रशासनाला जाब विचारला. ड्युटीवर असलेल्या डॉक्टर आणि परिचारिकांना या गंभीर प्रकाराची साधी पुसटशी कल्पनाही नसल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. आमची आजी आधीच गंभीर अवस्थेत असताना आयसीयू सारख्या संवेदनशील ठिकाणी उंदीर फिरत असतील, तर रुग्णालयाची स्वच्छता कुठे गेली? रात्रीच्या वेळी कोणाचेच लक्ष नव्हते का? असा संतप्त सवाल त्यांच्या नातेवाईकांनी उपस्थित केला आहे.

पंडित भीमसेन जोशी रुग्णालय हे मिरा-भाईंदरमधील एकमेव मोठे सरकारी रुग्णालय आहे. मात्र, येथे वारंवार डॉक्टरांची कमतरता, अपुरे मनुष्यबळ आणि अस्वच्छतेच्या तक्रारी समोर येत असतात. आयसीयूमध्ये घडलेल्या या ताज्या प्रकरणामुळे रुग्णालयाचा हलगर्जीपणा चव्हाट्यावर आला असून, दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. व्हेंटिलेटरवरील रुग्णाची ही अवस्था पाहून सर्वसामान्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.